# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)
### -: सभेचे इतिवृत्त :-

मा. प्रशासक तथा अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण समिती, मनपा नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दिनांक 28.02.2025 रोजी वेळ सकाळी 11.00 वाजता नविन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात संपन्न झालेल्या वृक्ष प्राधिकरण सभेचे इतिवृत्त.

या सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित आहेत.

1) श्री. गणेश राठोड, उपायुक्त (उद्यान) तथा वृक्ष अधिकारी

2) श्री. अमोल चौरपगार, वृक्ष संवर्धक

या सभेत खालील प्रमाणे नमूद विषयावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

**विषय क्र. 1**

कार्यालयास दिनांक 31.10.2023 ला प्राप्त मा. प्रकल्प व्यवस्थापक, भारतीय राष्ट्रीय राज्य राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी इंदोर चौक ते दिघोरी चौक, नागपूर येथिल नविन उड्डाणपूलाच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या झाडास कापणी करण्याची परवानगी मिळण्याकरीता विनंती केली होती.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, इंदोर चौक ते दिघोरी चौक, नागपूर येथील रस्त्याच्या जागेवर नविन उड्डाणपूलाचे बांधकाम प्रस्तावित असून या रोडलगत असलेल्या **पुरातन** (हेरीटेज) पिंपळ-७ (प्रत्यारोपण), कडूनिंब-९, सप्तपर्णी-१, महारुग-१, चीचवल-१, गुलमोहर-१, सिसम-१, कारंजी-१, अशोका-१, आंबा-१, वड-१(प्रत्यारोपण) एकूण २९ नग झाडे व **नॉन हेरीटेज** करंजी-५, सप्तपर्णी-३, गुलमोहर-२, कडूनिंब-९, फुलझाड-४, बदाम-७, कोनोकार्पस-७, बकुळ-२, पेल्ट्राफॉर्म-५, उंबर-४, कणेर-२, बेल-१, टाबुनिया-३, अशोका-३, आंबा-१, सुबाभूळ-३, चाफा-३, पिंपळ-४(प्रत्यारोपण), सेमल-१, कटुंबर-१, पेरू-१, सीताफळ-१, सिसम-१, जांभूळ-२, रेनट्री-२, पाखळ-१, केशिया-२ **एकूण ८०** नग झाडे अशी एकूण (२९+८०) **१०९** नग झाडे प्रस्तावित उड्डाणपूलाच्या बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात क्र. 900/PR अन्वये दिनांक 22.01.2025 ला **जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांचे आक्षेप मागविण्यात आले असता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीवर 09 नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले. त्यानुषंगाने दिनांक 20.02.2025 रोजी आक्षेपकर्त्यांची सुनावणी घेण्यात आली असून सभेचे इतिवृत्त नस्तीस सलग्न आहे.**

या प्रकरणी अर्जदारास इंदोर चौक ते दिघोरी चौक, नागपूर येथील जागेवर नविन उड्डाणपूलाचे बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) 29 व नॉन हेरीटेज 80 अश्या एकूण 109 नग झाडाच्या मोबदल्यात नविन सावलीची 3962 नग झाडांची लागवड करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने 109 नग झाडाच्या मोबदल्यात **3962 नग** झाडांची लागवड गोरेवाडा प्रकप्ल नागपूर येथील परिसरात करण्यात येणार आहे असे प्रकल्प व्यवस्थापक (NHAI) यांनी दि. 27.02.2025 रोजी पत्राद्वारे सूचित केले.

इंदोर चौक ते दिघोरी चौक, नागपूर येथील जागेवर नविन उड्डाणपूलाचे बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **पुरातन (हेरीटेज)** 29 व **नॉन हेरीटेज** 80 अश्या एकूण 109 नग झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण** भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये **प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या** कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) **अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची** 3962 नग **नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 40,46,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 4,04,600/- असे एकूण रु. 44,50,600/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली **पुरातन (हेरीटेज)** 29 व **नॉन** हेरीटेज 80 विविध प्रजातीची अशी एकूण 109 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याचा विषयावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

चर्चेअंती या उड्डाणपुलाच्या बांधकामात तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात पर्यायी वृक्ष लागवड 3962 नग झाडांची लागवड गोरेवाडा प्रकल्प, नागपूर येथील परिसरात करण्यात येणार आहे. सदर प्रकल्प 100 किमी पेक्षा जास्त लांबीचा नसल्यामुळे या करीता Environmental Clearance लागू नाही. सदर प्रकल्पाचे बांधकाम नागपूर शहरातील दाट लोकवस्ती नागरी भागातून जात असल्याने उपलब्ध संरेखन मध्ये सुद्धा बदल करणे शक्य नसल्याचे अर्जदाराने कळविले आहे. एकंदरीत आक्षेपकर्त्यांनी उपस्थित केलेले आक्षेप व या प्रकल्पामुळे शहरातील अवजड वाहतूक आणि उत्तर नागपूर ते दक्षिण नागपूर

या मार्गावरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी या उड्डाणपुलाचे बांधकाम करणे आवश्यक आहे. करीता आक्षेपकर्त्यांनी उपस्थित केलेले आक्षेप फेटाळून वरील अटी शर्ती अन्वये, इंदोर चौक ते दिघोरी चौक, नागपूर येथिल नविन उड्डाणपूलाच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **पुरातन (हेरीटेज)** पिंपळ-7, वड-1 व **नॉन हेरीटेज** पिंपळ-4 अश्या एकूण 12 नग झाडास प्रत्यारोपण तसेच पुरातन (हेरीटेज) 21 व नॉन हेरीटेज 76 अशी एकूण (21+76=97) 97 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची या समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

## विषय क्र. 2

कार्यालयास दिनांक 15.10.2024 ला प्राप्त अति. कार्यकारी अभियंता (स्था) स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था उपविभाग क्र.१, म.रा.वि.वि.कं.मर्या. नागपूर यांनी १३२ के.व्ही. बेसा उपकेंद्र, म्हाळगी नगर, नागपूर येथील बेसा उपकेंद्र परिसरातील जागेवर प्रस्तावित नविन ३३/११ के.व्ही. क्षमतेचे विद्युत रोहित्र व स्विचगार्डच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या झाडास कापणी करण्याची परवानगी मिळण्याकरीता विनंती केली होती.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, १३२ के.व्ही. बेसा उपकेंद्र, म्हाळगी नगर, नागपूर. येथील जागेवर म.रा.वि.वि.कं.मर्या. चे नविन ३३/११ के.व्ही. क्षमतेचे विद्युत रोहित्र व स्विचगार्डचे बांधकाम प्रस्तावित असून या जागेवर असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** चिचबिलाई-०१, गुलमोहर-०४, एकूण **५** नग झाडे व नॉन हेरिटेज गुलमोहर-२१, सुबाभूळ-१२, पेल्ट्राफार्म-०७, चिचबिलाई-०८, कडूनिम-०५, केशिया-०३ एकूण **५६** नग झाडे अशी एकूण (५+५६) ६१ नग झाडे प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

**या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात क्र. 907/PR अन्वये दिनांक 23.01.2025 ला जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांचे आक्षेप मागविण्यात आले असता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीवर 08 नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले. त्यानुषंगाने दिनांक 20.02.2025 रोजी आक्षेपकर्त्यांची सुनावणी घेण्यात आली असून सभेचे इतिवृत्त नस्तीस सलग्न आहे.**

या प्रकरणी अर्जदारास १३२ के.व्ही. बेसा उपकेंद्र, म्हाळगी नगर, नागपूर. येथील जागेवरील प्रस्तावित म.रा.वि.वि.कं.मर्या. चे नविन ३३/११ के.व्ही. क्षमतेचे विद्युत रोहित्र व स्विचगार्डच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **पुरातन** (हेरीटेज) ५ व **नॉन हेरीटेज** ५६ अश्या एकूण ६१ नग झाडाच्या मोबदल्यात नविन सावलीची १३६३ नग झाडांची लागवड करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे. त्या

अनुषंगाने **६१** नग झाडाच्या मोबदल्यात **१३६३ नग** झाडांची लागवड मौजा हजारीपहाड, गौरखेडे कॉम्प्लेक्स नागपूर व मौजा वाठोडा श्रीकृष्ण नगर बगिचा नागपूर येथील परिसरात करण्यात येणार आहे असे कार्यकारी अभियंता महावितरण यांनी दि. 18.03.2025 रोजी पत्राद्वारे सूचित केले.

१३२ के.व्ही. बेसा उपकेंद्र, म्हाळगी नगर, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित म.रा.वि.वि.कं.मर्या. चे नविन ३३/११ के.व्ही. क्षमतेचे विद्युत रोहित्र व स्विचगार्डच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) **५** व नॉन हेरीटेज **५६** अश्या एकूण **६१** नग झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची १३६३ नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 14,36,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 1,43,600/- असे एकूण रु. 15,79,600/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली **पुरातन (हेरीटेज)** 05 व **नॉन हेरीटेज** 56 विविध प्रजातीची अशी एकूण ६१ नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याचा विषयावर सभेत १३२ के.व्ही. बेसा उपकेंद्र, म्हाळगी नगर, नागपूर येथील बेसा उपकेंद्र परिसरातील जागेवर प्रस्तावित नविन ३३/११ के.व्ही. क्षमतेचे विद्युत रोहित्र व स्विचगार्ड बांधकामाची जागा बदल करणे शक्य आहे का? याबाबत चर्चा करण्यात आली.

चर्चे दरम्यान अर्जदाराने दिनांक 21.02.2025 च्या पत्रात नमूद असल्याप्रमाने अर्जदाराने कळविले कि, तांत्रिक कारणामुळे सदर जागेमध्ये बदल करणे शक्य नाही. वाढत्या विजेच्या वापरामुळे या प्रकल्पाच्या ब धकामाने नागरिकांना अखंडीत वीज पुरवठा करणे शक्य होईल. करीता वरील नमूद अटी शर्तीच्या अधि न राहून प्रस्तावित नविन ३३/११ के.व्ही. क्षमतेचे विद्युत रोहित्र व स्विचगार्ड बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या **पुरातन (हेरीटेज)** 05 व **नॉन हेरीटेज** 56 अशी एकूण ६१ नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची वृक्ष प्राधिकरण समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 3

कार्यालयास दिनांक.13.12.2024 ला प्राप्त कार्यकारी अभियंता, म.रा.वि.पा.कं.लि. बेसा वीज पुरवठा उपकेंद्र, म्हाळगी नगर, नागपूर. यांनी १३२ के.व्ही. बेसा उपकेंद्र, म्हाळगी नगर, नागपूर. येथील बेसा उपकेंद्र परिसरातील जागेवर प्रस्तावित नविन 50 MVA क्षमतेचे विद्युत रोहित्रच्या (Transformer) बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या झाडास कापणी करण्याची परवानगी मिळण्याकरीता विनंती केली होती.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, १३२ के.व्ही. बेसा उपकेंद्र, म्हाळगी नगर, नागपूर. येथील जागेवर म.रा.वि.पा.कं.लि चे नविन 50 MVA क्षमतेचे विद्युत रोहित्रचे बांधकाम प्रस्तावित असून या जागेवर असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** कडूनिम-०१ व चिचबिलाई-०१ एकूण **०२ नग** झाडे **व नॉन (हेरीटेज)** बाभूळ-२५, सुबाभूळ-२३, बोर-३५, चिचबिलाई-३१, जंगली करंज-०२, कडूनिम-०६, केशिया-०६, गुलमोहर-०१, हिवर-०१, करंज-०१, एकूण **१३१** नग झाडे अशी एकूण **(१३१+२) १३३** नग झाडे प्रस्तावित बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

**या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात क्र. 907/PR अन्वये दिनांक 23.01.2025 ला जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांचे आक्षेप मागविण्यात आले असता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीवर 08 नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले. त्यानुषंगाने दिनांक 20.02.2025 रोजी आक्षेपकर्त्यांची सुनावणी घेण्यात आली असून सभेचे इतिवृत्त नस्तीस सलग्न आहे.**

या प्रकरणी अर्जदारास १३२ के.व्ही. बेसा उपकेंद्र, म्हाळगी नगर, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित म.रा.वि.पा.कं.लि. चे नविन 50 MVA क्षमतेचे विद्युत रोहित्रच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) २ व नॉन हेरीटेज **१३१** अश्या एकूण **१३३** नग झाडाच्या मोबदल्यात नविन सावलीची **२३११** नग झाडांची लागवड करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने **१३३** नग झाडाच्या मोबदल्यात **२३११ नग** झाडांची लागवड मानेवाडा नविन दहन घाट, नाल्याबाजुला बेसा रोड, नागपूर. येथील परिसरात करण्यात येणार आहे असे कार्यकारी अभियंता महापारेषण यांनी दि. 18.03.2025 रोजी पत्राद्वारे सूचित केले.

१३२ के.व्ही. बेसा उपकेंद्र, म्हाळगी नगर, नागपूर. येथील जागेवरील प्रस्तावित म.रा.वि.पा.कं.लि. चे नविन 50 MVA क्षमतेचे विद्युत रोहित्रच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) **२** व नॉन हेरीटेज **१३१** अश्या एकूण **१३३** नग झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम**

8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची २३११ नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 24,56,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 2,45,600/- असे एकूण रु. 27,01,600/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली पुरातन (हेरीटेज) 02 व नॉन हेरीटेज 131 विविध प्रजातीची अशी एकूण 133 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याचा विषयावर सभेत चर्चा करण्यात आली.

चर्चेदरम्यान अर्जदाराचे कार्यालयास प्राप्त दिनांक 20.02.2025 चे पत्रात नमूद असल्याप्रमाने सदर जागेव्यतिरिक्त पर्यायी जागा उपलब्ध नाही. सदर बांधकामाकरीता Environmental Clearance लागू नाही, नगररचना (Town Planning) ची परवानगी लागू नाही. सदर ठिकाणच्य तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात पर्यायी वृक्ष लागवड महावितरणचे उपकेंद्र मानकापूर, बेसा, पारडी, उप्पलवाडी, खापरी, हिंगाना-1, हिंगाना-2 अश्या एकूण 7 उपकेंद्रच्या परीसरात 560 नग झाडे लावण्यात येतील व उर्वरीत 1296 नग झाडे लागवड करण्याकरीता जागेचा शोध घेण्यात आला असून जागेबाबत ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. जनतेच्या वाढत्या वीज मागणी पुरवठा लक्षात घेता नविन 50 MVA क्षमतेचे विद्युत रोहित्रच्या बांधकाम वीज पुरवठा क्षमतेत वाढ करण्याच्या दृष्टीने अनिवार्य असल्याने आक्षेपकर्त्यांनी उपस्थित केलेले आक्षेप अस्वीकार करून नविन 50 MVA क्षमतेचे विद्युत रोहित्रच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) २ व नॉन हेरीटेज १३१ अश्या एकूण १३३ नग झाडास वरील अटी शर्तीच्या अधिन राहून जमिनीपासून कापणी करण्याची वृक्ष प्राधिकरण समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 4**

कार्यलयास दिनांक 04.12.2024 ला प्राप्त डॉ. उदय के. माहोरकर, नागपूर, यांनी ना.भु.क. 450/449, प्लॉट नं. 113, अवंती इन्स्टीटयुट ऑफ कॉर्डीओलॉजी प्रा. ली., धंतोली, नागपूर या जागेवरील प्रस्तावित हॉस्पीटलच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या सरू -1, आंबा -2, बदाम-1, आपटा-1, प्रजातीच्या एकूण 05 झाडास जमिनीपासून कापणी करण्याची परवानगी मिळण्याकरीता विनंती केली होती.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, ना.भु.क. 450/449, प्लॉट नं. 113, अवंती इन्स्टीटयुट ऑफ कॉर्डीओलॉजी प्रा. ली. धंतोली, नागपूर या जागेवरील प्रस्तावित हॉस्पीटलच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या सरू-1, आंबा-2, बदाम-1, आपटा-1 प्रजातीच्या एकूण 05 नग (2 हेरिटेज व 03 नॉन हेरिटेज) झाडे प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

**या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात क्र. 880/ PR दिनांक 16.01.2025 ला जाहिरात प्रसिध्द करून नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले. त्यानुषंगाने दिनांक 12.02.2025 रोजी सुनावणी झाली असून आक्षेपकर्त्यांस प्रत्यक्ष ठिकाणी नेउन झाडे प्लॅान नुसार कसे बांधकामात येतात दाखविण्यात आले असता आक्षेपकर्त्यांनी सदर बांधकामासबंधी बदाम प्रजातीच्या झाड क्र. 3 ला वाचवने तसेच अर्ल्टरनेट प्लॅन, इन्वायरमेंट क्लिअरन्सचे प्रमाणपत्र, पर्यायी वृक्ष लागवडीबाबत पुर्तता मागविण्यात आले असून अर्जदारांनी बदाम प्रजातीच्या झाडास वाचवून बांधकाम करणार असून इतर आक्षेपांची पुर्तता केलेली आहे, त्या संबधीत सुनावनीच्या बैठकीचे इतिवृत्ताचे अहवाल सदर नस्तीस सलग्न आहे.**

या प्रकरणी अर्जदारास ना.भु.क. 450/449, प्लॉट नं. 113, अवंती इन्स्टीटयुट ऑफ कॉर्डीओलॉजी प्रा. ली., धंतोली, नागपूर या जागेवरील प्रस्तावित हॉस्पीटलच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या सरू 1, आंबा 2, आपटा 1, प्रजातीच्या एकूण 04 नग (2 हेरिटेज व 02 नॉन हेरिटेज) नग झाडांच्या मोबदल्यात नविन सावलीची 161 नग झाडांची लागवड करण्याबाबत पत्र देण्यात आले असून अर्जदारानी डॉ. पंजाबराव देशमुख, कृषि विद्यापीठ, वनशेती संशोधन प्रक्षेत्र, फुटाला, नागपूर येथे 150 नग वृक्ष लागवड केली असून सदर लागवड केलेल्या वृक्षांची योग्यप्रकारे देखभाल केल्या जात असून सबब नियोजन सादर केले आहे.

ना.भु.क. 450/449, प्लॉट नं. 113, अवंती इन्स्टीटयुट ऑफ कॉर्डीओलॉजी प्रा. ली., धंतोली, नागपूर या जागेवरील प्रस्तावित हॉस्पीटलच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या सरू 1, आंबा 2, आपटा 1 प्रजातीच्या एकूण 04 नग (2 हेरिटेज व 02 नॉन हेरिटेज) नग झाडांच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच. जुलै 5. 2021/आषाढ 14. शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मुळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची 161 नग**

**नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराडून 161 नग वृक्षा लागवड व 7 वर्षे देखभालीकरीता लागणारी रक्कम 161,000/- व प्रशासकीय शुल्क रू. 16,100/- असे एकूण रू. 1,77,100/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणची सरू 1, आंबा 2, आपटा 1, प्रजातीच्या एकूण 04 (2 हेरिटेज व 02 नॉन हेरिटेज) नग जमिनीपासून कापणी करण्याबाबतचा मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर समितीत चर्चा करण्यात आली.

चर्चेअंती अर्जदाराने दिनांक 18.02.2025 ला दिलेल्या पत्रान्वये, अर्जदाराने कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात पर्यायी झाडांची लागवड 150 नग झाडे कृषी वनशेती संशोधन प्रक्षेत्र अमरावती रोड, नागपूर या परिसरात केलेली आहे. उर्वरीत 50 नग झाडांची लागवड करण्यात येईल. तोडण्यात येणारी झाडे प्रस्तावित रुग्णालयाच्या नविन इमारतीच्या ड्रायिव्ह वे पार्किंग, कन्सल्टिंग रूम, OPD वेटिंग, ऑपरेशन थीयटर, CSSD इत्यादी वेगवगळया मजल्यावर असल्याने इमारतीच्या बांधकामात बदल करणे शक्य नाही. तसेच सदर इमारतिचे बांधकाम 6999.46 Sq. mt. असल्याने करीता Environmental Clearaance लागू नाही. एकंदरीत कार्यालयास प्राप्त पत्रान्वये व आक्षेपकर्त्यांनी उपस्थितले आक्षेपअन्वये सदर प्रस्तावित इमारतीच्या बांधकाम रुग्णांना अत्याधुनिक सुविधा पुरविण्याच्या हेतूपुरेस्पर असल्याने आक्षेप कर्त्यांनी उपस्थितले आक्षेप अस्वीकार करून व वरील अटी शर्तीच्या अधिन राहून प्रस्तावित नविन हॉस्पिटल इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **पुरातन (हेरीटेज)** सरू-1, आंबा-1 व **नॉन हेरीटेज** आपट-1, आंबा-1 अश्या एकूण (2+2=4) 4 नग झाडास जमिनीपासून कापणी करण्याची वृक्ष प्राधिकरण समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**विषय क्र. 5**

कार्यलयास दिनांक 26.07.2024 ला प्राप्त कार्यकारी अभियंता, डि.पी.डी.सी., महानगरपालिका, नागपूर यांनी न.भु.क. 2467, ठक्करग्राम, पाचपावली, नागपूर या जागेवरील प्रस्तावित ई लायब्ररीच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या वड प्रजातीच्या एकूण 01 झाडास जमिनीपासून कापणी/ प्रत्यारोपण करण्याची परवानगी मिळण्याकरीता विनंती केली होती.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, न.भु.क. 2467, ठक्करग्राम, पाचपावली, नागपूर या जागेवरील प्रस्तावित ई लायब्ररीच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या वड प्रजातीच्या एकूण 01 नग हेरिटेज झाड प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

**या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात क्र. 821/ PR दिनांक 31.12.2024 ला जाहिरात प्रसिध्द करून नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले.** त्याअनुषंगाने दिनांक 14.01.2025 रोजी सुनावणी झाली असून आक्षेपकर्त्यांस प्रत्यक्ष ठिकाणी नेउन झाडे प्लॉन नुसार कसे बांधकामात येतात दाखविण्यात आले असता आक्षेपकर्त्यांनी सदर बांधकामात वड प्रजातीचे झाड हेरिटेज असून झाडास वाचवून बांधकाम करणार याबाबत कार्यकारी अभियंता, डि.पी.डी.सी., महानगरपालिका, नागपूर यांच्याशी चर्चा करण्यात आली, तसेच सुनावणी दरम्यान सदर वड प्रजातीच्या हेरिटेज झाडास वाचवून बांधकाम करणार असून कार्यकारी अभियंता, डि.पी.डी.सी., महानगरपालिका, नागपूर यांनी सांगीतले आहे असे आक्षेप ठेवण्यात आले.

या प्रकरणी अर्जदारास न.भु.क. 2467, ठक्करग्राम, पाचपावली, नागपूर या जागेवरील प्रस्तावित ई लायब्ररीच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या वड प्रजातीच्या एकूण 01 नग हेरिटेज झाडांच्या मोबदल्यात नविन सावलीची 188 नग झाडांची लागवड करणे व सदर झाडास प्रत्यारोपण करणे बंधनकारक राहील.

न.भु.क. 2467, ठक्करग्राम, पाचपावली, नागपूर या जागेवरील प्रस्तावित ई लायब्ररीच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या वड प्रजातीच्या एकूण 01 नग हेरिटेज झाडांच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच. जुलै 5. 2021/आषाढ 14. शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मुळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची 188 नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव सदर ठिकाणची वड प्रजातीच्या एकूण 01 नग हेरिटेज झाड प्रत्यारोपण करण्याबाबतचा विषयावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

चर्चेदरम्यान या झाडामुळे नविन प्रस्तावित इमारतीला धोका होऊ शकते याबाबत कार्यालयास प्राप्त तांत्रिक सल्लागार यांच्या Structural Audit Report अहवाल तसेच IS Code 1904-1986 नुसार झाडामुळे इमारतीच्या Foundation ला इजा होऊ शकते. सदर इमारतीच्या बांधकामामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाकरीता अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार या हेतून व कार्यालयास प्राप्त Structural Audit Report अहवाला नुसार आक्षेपकर्त्यांनी उपस्थितले आक्षेप अस्वीकार करून नविन प्रस्तावित इमारतीच्या

बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) एक वड झाडास प्रत्यारोपण करण्याची या समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 6

**अर्जदाराचे नाव :-** श्री. तुषार प्रमोद आठवले.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 28.01.2025.

**झाडाची प्रजाती :-** 1) **महारुख -1, झाडाची गोलाई**-77 इंच, झाडाची वय-74 वर्ष (हेरीटेज).

2) **शेवगा-1, झाडाची गोलाई**-47 इंच, **झाडाची वय**- 45 वर्ष (नॉन हेरीटेज)

3) **बोर -1, झाडाची गोलाई**-34 इंच, **झाडाची वय**- 32 वर्ष (नॉन हेरीटेज)

**प्रशाकीय शुल्क :-** 1500/-

**झाडाचे विवरण :-** मौजा भामटी, सरस्वती गृहनिर्माण हाउसिंग सोसायटी भूखंड क्र. 26, नागपूर येथिल खाजगी क्षेत्रातील खाली जागेत **महारुख** 1 **हेरीटेज** व **शेवगा** 1, **बोर** 1 **नॉन हेरिटेज** एकूण 03 झाड आहे. सदर झाडाच्या उंच वाढलेल्या व झुकलेल्या फांद्या परिसरात अडथळा निर्माण करत आहे. करिता सदर झाडाच्या फाद्यां छाटणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधकाधक चर्चा होऊन सदर झाडाच्या परिसरात अडथळा निर्माण करणाऱ्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 7

**अर्जदाराचे नाव :-** श्री. विवेक नातु

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 29.01.2025

**झाडाची प्रजाती :-** 1) **पिंपळ-1, झाडाची गोलाई**-105 इंच, झाडाची वय-101 वर्ष (हेरीटेज).

2) **चिचबिलाई-1, झाडाची गोलाई**-62 इंच, झाडाची वय-59 वर्ष (हेरीटेज).

**प्रशाकीय शुल्क :-** 1000/-

**झाडाचे विवरण :-** सावित्री अपार्टमेंटस श्रध्दानंदपेठ, बुटी ले-आऊट, नागपूर येथिल श्री. विवेक नातु यांच्या घरपरीसरात **पिंपळ 1 व चिचबिलाई 1** असे एकूण **हेरिटेज** 02 झाड आहे. सदर झाडाच्या फांद्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या आहे. करिता सदर झाडाच्या फाद्यां छाटणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधकाधक चर्चा होऊन सदर झाडाच्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 8

**अर्जदाराचे नाव :- श्री. समरेश रॉय चौधरी, (सचिव)**

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 29.11.2024

**झाडाची प्रजाती :- पिंपळ-1, झाडाची गोलाई-100 इंच, झाडाची वय-96 वर्ष (हेरीटेज).**

**प्रशाकीय शुल्क :-** 500/-

**झाडाचे विवरण :-** शिवम अपार्टमेंटस् सुरेंद्र नगर, आर.पी.टी.एस. रोड, नागपूर येथिल खाजगी क्षेत्रामध्ये **पिंपळ 1 हेरिटेज** झाड आहे. सदर झाडाच्या फांद्या इमारतीवर व परिसरात अडथळा निर्माण करत आहे.करिता सदर झाडाच्या फाद्यां फांद्यांची छाटणी करण्याची मंजूरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन समितीने वरील नमूर वृक्षाच्या इमारतीवर व परिसरात अडथळा निर्माण करणाऱ्या फांद्यांची छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 9

**अर्जदाराचे नाव :- श्री. मानसरंजक विठ्ठलराव भारगावे**

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 05.02.2025

**झाडाची प्रजाती :-** 1) बदाम -1, झाडाची गोलाई-76 इंच, **झाडाची वय-72 वर्ष (हेरीटेज)**

2) बदाम -1, झाडाची गोलाई-22 इंच, **झाडाची वय-20 वर्ष (नॉन हेरीटेज)**

**प्रशाकीय शुल्क :-** 1000/-

**झाडाचे विवरण :-** 2338, गोपाल नगर, जुमळे शिवन कला महाविद्यालय, नागपूर येथिल म.न.पा. क्षेत्रामध्ये बदाम 1 हेरिटेज व बदाम 1 नॉन हेरिटेज झाड आहे. सदर झाडाच्या फांद्या इमारतीवर व रोडवर झुकलेल्या असून अडथळा निर्माण करत असल्याने फांद्यांची छाटणी करणे आवश्यक असल्याने झाडाच्या फांद्या इमारतीवर व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 10

**अर्जदाराचे नाव :- श्री. राजेंद्र सुर्यभान गिरडकर**

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 10.02.2025

**झाडाची प्रजाती :-** आंबा -2, झाडाची गोलाई- 52-74 इंच, झाडाची वय-50-71 वर्ष (हेरीटेज).

**प्रशाकीय शुल्क :-** 1000/-

**झाडाचे विवरण :-** 779 बी, वैशाली नगर, कमाल टॉकीज रोड, नागपूर येथिल म.न.पा. क्षेत्रामध्ये **आंबा** 2 **हेरिटेज** झाड आहे. सदर झाडाच्या फांद्या इमारतीवर, विद्युत तारेवर व पाण्याच्या टाकीवर झुकलेल्या असून अडथळा निर्माण करत आहे. करिता सदर झाडाच्या फाद्यांची छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली, चर्चा होऊन समितीने वरील नमूद वृक्षाच्या इमारतीवर विद्युत तारेवर व पाण्याच्या टाकीवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 11**

**अर्जदाराचे नाव :- श्री. संजय जयस्वाल,(माजी नगर सेवक)**

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 29.01.2025

**झाडाची प्रजाती :-** कडुलिंब-2, झाडाची गोलाई, 52-120 इंच, झाडाची वय 50-115 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** अशोक नगर, कामठी रोड, नागपूर येथिल म.न.पा. क्षेत्रामध्ये **कडुलिंब-2 हेरिटेज** झाड आहे. सदर झाडाच्या फांद्या जवळच्या घरावर व परिसरात झुकलेल्या असून अडथळा निर्माण करत आहे. करिता सदर झाडाच्या फाद्यां छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली, चर्चा होऊन समितीने वरील नमूद वृक्षाच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 12**

**अर्जदाराचे नाव :- श्री. राजेश तभाने**

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 04.02.2025

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ-1, झाडाची गोलाई-118, झाडाची वय-113 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** 95 बी, गजानन नगर, त्रिमुर्ती नगर चौक, नागपूर येथिल म.न.पा. क्षेत्रामध्ये **पिंपळ-1 हेरिटेज** झाड आहे. सदर झाडाच्या फांद्या रोडवर, घरावर व परिसरात झुकलेल्या असून अडथळा निर्माण करत आहे. करिता सदर झाडाच्या फाद्यां छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली, चर्चा होऊन समितीने वरील नमूद वृक्षाच्या रोडवर, घरावर व परिसरात झुकलेल्या झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

## विषय क्र. 13

**अर्जदाराचे नाव :-** श्री. महेंद्रा टी. पिथवा

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 20.01.2025

**झाडाची प्रजाती :-** शेमल-1, झाडाची गोलाई-110 इंच, झाडाची वय-107 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 233/A, गुजराती बिल्डिंग समोर, अमरावती रोड, नागपूर येथील रोडलगत असलेल्या एक शेमल झाडाच्या कुजलेल्या परिसरात व इमारतीकडील बाजूस झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील झाडाच्या कुजलेल्या परिसरात व इमारतीकडील बाजूस झुकलेल्या फांद्या छाटणी कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

## विषय क्र. 14

**अर्जदाराचे नाव :-** श्री. संजय अनंत बंगाले

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 09.01.2025

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ-1, झाडाची गोलाई-57 इंच, झाडाची वय-55 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** वसंतराव नाईक वसाहत अमरावती रोड, नागपूर येथील श्री. संतोष हरी प्रसाद खोले यांच्या घरच्या मागील भागात असलेल्या नालाच्या भिंतीतून निघालेल्या एक पिंपळ झाडाच्या घराच्या छतावर झुकलेल्या झाडाच्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील झाडाच्या इमारतीकडील बाजूस झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

## विषय क्र. 15

**अर्जदाराचे नाव :-** श्रीमती. खुशबू अभिषेक मिश्रा

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 03.02.2025

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ-1, झाडाची गोलाई-110 इंच, झाडाची वय-106 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** व्ही. एच. बी. कॉलोनी, सदर, शीतला माता मंदीर मागे असलेल्या एक पिंपळ झाडाच्या अर्जदाराच्या इमारतीकडील बाजूस व रोडवर झुकलेल्या झाडाच्या फांद्या छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली, चर्चा होऊन समितीने वरील नमूद वृक्षाच्या इमारतीकडील बाजूस व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

## विषय क्र. 16

**अर्जदाराचे नाव :-** श्री. मनीष ठाकरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सदर पोलीस ठाणे, नागपूर शहर

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 30.01.2025

**झाडाची प्रजाती :-** 1) पिंपळ-1, झाडाची गोलाई-85 इंच, झाडाची वय-83 वर्ष (हेरीटेज).

2) निलगिरी-1, झाडाची गोलाई-68 इंच, झाडाची वय-63 वर्ष (हेरीटेज).

3) बदाम-1, झाडाची गोलाई-78 इंच, झाडाची वय-74 वर्ष (हेरीटेज).

4) कडूनिम-1, झाडाची गोलाई-78 इंच, झाडाची वय-74 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** सदर पोलीस ठाणे, नागपूर शहर येथील परिसरात असलेल्या विविध प्रजातीच्या हेरीटेज असलेल्या 4 नग झाडाच्या परिसरात व इमारतीवर झुकलेल्या झाडाच्या फांद्या छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली, चर्चा होऊन समितीने वरील नमूद 4 वृक्षाच्या परिसरात, इमारतीवर व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

## विषय क्र. 17

**अर्जदाराचे नाव :-** श्री. राजीव काळेले

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 23.01.2025

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ+वड-1, झाडाची गोलाई-140 इंच, झाडाची वय-135 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** हनुमान मंदिर, रामनगर, नागपूर येथील मागील परिसरात असलेल्या एक पिंपळ+वड झाडाच्या फांद्या मंदिराच्या छतावर व परिसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली, चर्चा होऊन समितीने वरील नमूद वृक्षाच्या मंदिराच्या छतावर व परिसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

## विषय क्र. 18

**अर्जदाराचे नाव :-** मा. वृक्ष संवर्धक

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 03.01.2025

**झाडाची प्रजाती :-** 1) चिचवा-1, झाडाची गोलाई- 116 इंच, झाडाची वय-112 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** कॉर्पोरेशन कॉलोनी, नाग नदीच्या नाल्याच्या बाजूला रोडलगत असलेल्या एक चिचवा झाडाच्या धोकादयाकरीत्या रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याच्या विषयावर सभेत साधकबाधक

चर्चा होऊन या **पुरातन (हेरीटेज)** चिचवा झाडाच्या धोकादयाकरीत्या रोडवर झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्यास समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 19**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. अजय बडगे

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 13.01.2025

**झाडाची प्रजाती :-** रेनट्री-1, झाडाची गोलाई-123 इंच, झाडाची वय-121 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 369, शंकर नगर, नागपूर येथील परिसरात रोडलगत असलेल्या एक रेनट्री झाडाच्या अर्जदाराच्या इमारतीच्या बाजूस व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याच्या विषयावर सभेत साधकबाधक चर्चा होऊन या **पुरातन (हेरीटेज)** रेनट्री झाडाच्या इमारतीच्या बाजूस व रोडवर झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्यास समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 20**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. देवेंद्र भारतीया

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 16.01.2025

**झाडाची प्रजाती :-** 1) निलगिरी-1, झाडाची गोलाई-103 इंच, झाडाची वय-98 वर्ष (हेरीटेज).

2) कडूनिम-1, झाडाची गोलाई-30 इंच, झाडाची वय-28 वर्ष (हेरीटेज).

**प्रशासकीय शुल्क :-** रु. 1,000/-

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 5, विष्णू वैभव अपार्टमेंट, कॅनल रोड, नागपूर येथील परिसरात असलेल्या एक निलगिरी व कडूनिम झाडाच्या अर्जदाराच्या इमारतीवर धोकादयाकरित्या झुकलेल्या झाडाच्या फांद्या छाटणी करण्याच्या विषयावर सभेत साधकबाधक चर्चा होऊन या **पुरातन (हेरीटेज)** झाडाच्या इमारतीवर धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्यास समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 21**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. विनय दुबे

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 01.02.2025

**झाडाची प्रजाती :-** निलगिरी-1, झाडाची गोलाई-94 इंच, झाडाची वय-91 वर्ष (हेरीटेज).

**प्रशासकीय शुल्क :-** रु. 500/-

A

**झाडाचे विवरण :-** अमरावती रोड, नागपूर येथील नालंदा अपार्टमेंट परिसरात असलेल्या एक निलगिरी झाडाच्या इमारतीकडील बाजूस झुकलेल्या फांद्यांची कापणी करणे आवश्यक असल्याने निलगिरी झाडाच्या इमारतीकडील बाजूस झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 22

**अर्जदाराचे नाव :-** श्री. निशांत अरखराव.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 11.02.2025

**झाडाची प्रजाती :- पिंपळ, झाडाची गोलाई-** 322 **इंच, झाडाची वय-** 318 **वर्ष** (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 463, नवीन सुभेदार लेआउट, नागपूर. येथील श्री. निशांत अरखराव यांच्या घरासमोरील परिसरात **पुरातन (हेरीटेज)** एक पिंपळ प्रजातीच्या झाडाच्या फांद्या छाटणी करण्याच्या विषयावर सभेत साधकबाधक चर्चा होऊन या **पुरातन (हेरीटेज)** पिंपळा झाडाच्या झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्यास समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 23

**अर्जदाराचे नाव :-** श्री. अमित तिजारे.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 10.02.2025

**झाडाची प्रजाती :- वड, झाडाची गोलाई-**326 **इंच, झाडाची वय-** 320 **वर्ष** (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** जुना सक्करदरा, गवंडीपुरा, नागपूर. येथील श्री. अमित तिजारे यांच्या घरासमोरील परिसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** एक वड प्रजातीच्या झाडाच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्यांची कापणी करणे आवश्यक असल्याने वड झाडाच्या परिसरात झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 24

**अर्जदाराचे नाव :-** श्रीमती. वर्षा धाबेकर

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 29.11.2024

**झाडाची प्रजाती :- रेनट्री, झाडाची गोलाई-** 234 **इंच, झाडाची वय-** 230 **वर्ष** (हेरीटेज)

**सप्तपर्णी, झाडाची गोलाई-** 39 **इंच, झाडाची वय-** 37 **वर्ष** (नॉन हेरीटेज)

**झाडाचे विवरण** :- प्लॉट नं.16, गुरुदेव नगर, नंदनवन, नागपूर. येथील श्रीमती. वर्षा धाबेकर यांच्या घरासमोरील परिसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** एक रेनट्री व **नॉन हेरीटेज** एक सप्तपर्णी झाडाच्या रोडवर व परिसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याच्या विषयावर सभेत साधकबाधक चर्चा होऊन या **पुरातन (हेरीटेज)** सप्तपर्णी झाडाच्या रोडवर व परिसरात झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्यास समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 25

**अर्जदाराचे नाव** :- श्री. रविशंकर तिहाले.

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :- 09.01.2025

**झाडाची प्रजाती** :- **पिंपळ, झाडाची गोलाई- 101 इंच, झाडाची वय- 98 वर्ष (हेरीटेज)**

**कडूनिम, झाडाची गोलाई- 32 इंच, झाडाची वय- 30 वर्ष (नॉन हेरीटेज)**

**झाडाचे विवरण** :- प्लॉट नं.39, वैभव नगर, हनुमान पंचकमेटी मंदिर, नागपूर. येथील श्री. रविशंकर तिहाले यांच्या मंदिर परिसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** एक पिंपळ व **नॉन हेरीटेज** एक कडूनिम झाडाच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्या कापणी करणे आवश्यक असल्याने एक पिंपळ व **नॉन हेरीटेज** एक कडूनिम झाडाच्या परिसरात झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 26

**अर्जदाराचे नाव** :- श्री. दत्तात्रय शिंदे.

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :- 13.01.2025

**झाडाची प्रजाती** :- **पिंपळ, झाडाची गोलाई- 327 इंच, झाडाची वय- 320 वर्ष (हेरीटेज)**

**रेनट्री, झाडाची गोलाई- 42 इंच, झाडाची वय- 40 वर्ष (हेरीटेज)**

**कडूनिम, झाडाची गोलाई- 36 इंच, झाडाची वय- 34 वर्ष (नॉन हेरीटेज)**

**झाडाचे विवरण** :- प्लॉट नं.115, मिरे ले-आउट, नागपूर. येथील हनुमान मंदिर परिसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** एक पिंपळ, **नॉन हेरीटेज** एक रेनट्री व एक कडूनिम प्रजातीच्या झाडाच्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याच्या विषयावर सभेत साधकबाधक चर्चा होऊन या **पुरातन (हेरीटेज)** वर नमूद 3 नग झाडाच्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्यास समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 27

**अर्जदाराचे नाव** :- श्री. सुशील शर्मा.(ACPM/MRIDC )

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :-06.11.2024

**झाडाची प्रजाती** :-**पिंपळ, झाडाची गोलाई- 105 इंच, झाडाची वय- 103 वर्ष (हेरीटेज)**

**वड-5, झाडाची गोलाई-31ते148इंच, झाडाची वय-29ते144वर्ष (हेरीटेज)**

**गुलमोहर-7, झाडाची गोलाई-35ते71इंच,झाडाची वय-33ते68वर्ष(हेरीटेज)**

**रेनट्री-31, झाडाची गोलाई-40ते129इंच, झाडाची वय-38ते125वर्ष (हेरीटेज)**

**केशिया-3,झाडाची गोलाई-35ते43इंच, झाडाची वय-33ते40वर्ष (नॉन हेरीटेज)**

**कडूनिम-5, झाडाची गोलाई-31ते79इंच, झाडाची वय-29ते76वर्ष (हेरीटेज)**

**करंज-5,झाडाची गोलाई-36ते46इंच, झाडाची वय-34ते 44 वर्ष (नॉन हेरीटेज)**

**जांभूळ , झाडाची गोलाई-49 इंच, झाडाची वय-47 वर्ष(नॉन हेरीटेज)**

**बदाम -2, झाडाची गोलाई-32ते52इंच,झाडाचीवय-30ते50वर्ष(नॉन हेरीटेज)**

**सप्तपर्णी-4,झाडाची गोलाई-30ते47इंच, झाडाची वय-28ते45वर्ष (नॉन हेरीटेज)**

**सिसम,झाडाची गोलाई-37 इंच, झाडाची वय-35वर्ष (नॉन हेरीटेज)**

**पेल्ट्राफार्म, झाडाची गोलाई-49 इंच, झाडाची वय-47 (नॉन हेरीटेज)**

**सुबाभूळ, झाडाची गोलाई-32 इंच, झाडाची वय-30 (नॉन हेरीटेज)**

**झाडाचे विवरण** :- के.डी.के. कॉलेज ते हसनबाग चौक ते पोलीस चौकी नागपूर. येथे MRIDC मार्फत नवीन उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. येथील परिसरात रोडलगत पुरातन **हेरीटेज** व **नॉन हेरीटेज** विविध प्रजातीच्या झाडांच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या व रोडवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याच्या विषयावर सभेत साधकबाधक चर्चा होऊन या **पुरातन (हेरीटेज**) वर नमूद झाडाच्या झाडांच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या व रोडवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 28**

**अर्जदाराचे नाव** :- श्री. श्रावन खापेकर.

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :- 16.01.2025

**झाडाची प्रजाती** :- **वड, झाडाची गोलाई -99 इंच, झाडाची वय 95 वर्ष (हेरीटेज)**

**झाडाचे विवरण :-** प्लॉट.न. चकना चौक, लालगंज पोलीस चौकी मागे, नागपूर. येथील श्री. श्रावन खापेकर यांच्या घराच्या समोरील परिसरात असलेल्या एक **पुरातन (हेरीटेज)** वड प्रजातीच्या झाडाच्या परिसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याच्या विषयावर सभेत साधकबाधक चर्चा होऊन या **पुरातन (हेरीटेज)** वड झाडाच्या परिसरात झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्यास समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 29

**अर्जदाराचे नाव :- श्री.** प्रशांत रमेशराव मांडवकर.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 07.02.2025

**झाडाची प्रजाती :- पिंपळ, गोलाई- 68 इंच, झाडाची वय 65 वर्ष (हेरीटेज)**

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 1746, कांजी हाउस चौक, इटाभट्टी रोड, नागपूर. येथील घरसमोरील परिसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** एक पिंपळ प्रजातीच्या झाडाच्या फांद्या घर परिसरात झुकलेल्या आहे व बांधकामात अडथळा निर्माण करत आहे, करिता झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील पुरातन (हेरीटेज) पिंपळ झाडाच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 30

**अर्जदाराचे नाव :-** श्री. ज्ञानेश्वर एकाजी बारापात्रे.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 18.02.2025

**झाडाची प्रजाती :- पिंपळ झाडाची गोलाई - 126 इंच, झाडाची वय - 121 वर्ष (हेरीटेज)**

**झाडाचे विवरण :-** लाल बहादूर शास्त्री उद्यान मागे, कुंभारपुरा, पाचपावली, नागपूर. येथील श्री. ज्ञानेश्वर एकाजी बारापात्रे यांच्या घराच्या समोरील परिसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** एक पिंपळ प्रजातीच्या झाडाच्या परिसरात व विद्युत तारेवर झुकलेल्या फांद्या छाटणी फांद्यांची कापणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील पुरातन (हेरीटेज) पिंपळ झाडाच्या परिसरात व विद्युत तारेवर झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 31

**अर्जदाराचे नाव** :- श्री. सदगुरू सदानंद रघुनंदन महाराज ट्रस्ट.

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :- 24.02.2025

**झाडाची प्रजाती :- पिंपळ, झाडाची गोलाई -127 इंच, झाडाची वय 123 वर्ष** (हेरीटेज)

**झाडाचे विवरण** :- टी.बी. दवाखान्याच्या मागे, जागनाथ बुधवारी, नागपूर. येथील मंदिर परिसरात असलेल्या एक **पुरातन (हेरीटेज)** पिंपळ प्रजातीच्या झाडाच्या परिसरात व मंदिरावर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील पुरातन (हेरीटेज) पिंपळ झाडाच्या परिसरात व मंदिरावर झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 32

**अर्जदाराचे नाव** :- श्री. नेहल पोउनकर.

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :- 28.01.2025

**झाडाची प्रजाती** :- **वड, झाडाची गोलाई -150 इंच, झाडाची वय 144 वर्ष** (हेरीटेज)

**झाडाचे विवरण** :- प्लॉट नं. 84 गरोबा मैदान, बोंद्रे हॉस्पिटल, नागपूर . येथील श्री. नेहल पोउनकर यांच्या घरासमोर असलेल्या एक **पुरातन (हेरीटेज)** वड झाडाच्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली, चर्चा होऊन समितीने वरील नमूद वृक्षाच्या इमारतीवर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 33

**अर्जदाराचे नाव** :- श्री. भाविक राजेंद्र सिंघने

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :- 10.02.2025

**झाडाची प्रजाती :- पिंपळ, गोलाई- 150 इंच, झाडाची** वय 144 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण** :- प्लॉट न.94 सतनामी नगर नागपूर. येथील श्री. भाविक राजेंद्र सिंघने यांच्या घसमोरील परिसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** एक पिंपळ प्रजातीचे झाडाच्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात

आली, चर्चा होऊन समितीने वरील नमूद वृक्षाच्या इमारतीवर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 34

**अर्जदाराचे नाव :-** श्री. गौरव गंधवार

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 08.02.2025

**झाडाची प्रजाती :- वड, झाडाची गोलाई -70 इंच, झाडाची वय** - 67 **वर्ष (हेरीटेज)**

**झाडाचे विवरण :-** वार्ड न.28 नागोबा मंदिर ,इतवारी हायस्कूल जवळ नागपूर. येथील श्री.गौरव गंधवार यांच्या घरासमोरील परिसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** एक वड झाडाच्या परिसरात व इमारतीवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली, चर्चा होऊन समितीने वरील नमूद वृक्षाच्या इमारतीवर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 35

**अर्जदाराचे नाव** :- श्रीमती. ममता महेश शहारे, माजी नगरसेविका प्रभाग क्र. 9

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :- 27.01.2025

**झाडाची प्रजाती** :- 1) आंबा, (खाजगी) झाडाची गोलाई- 68 इंच, झाडाचे वय- 65 वर्ष (हेरीटेज).

2) रेनट्री, झाडाची गोलाई- 110 इंच, झाडाचे वय- 105 वर्ष (हेरीटेज).

3) पिंपळ, झाडाची गोलाई- 256 इंच, झाडाचे वय- 250 वर्ष (हेरीटेज).

4) मोहागणी-2 झाडाची गोलाई- 110 इंच, झाडाचे वय- 105 वर्ष (हेरीटेज).

**प्रशाकीय शुल्क :-** 500/-

**झाडाचे विवरण** :- मंगळवारी झोन क्र.10 अंतर्गत येत असलेल्या प्रभाग क्र. 9 क, अंतर्गत येत असलेल्यला विविध ठिकाणी असलेल्या नागरिकांच्या घरपरिसरात व रोडलगत असलेल्या वर नमूद विविध प्रजातीच्या झाडाच्या इमारतीवर व रोडवर, विद्युत तारेवर व परिसरात झुकलेल्या फांद्याची छाटणी करणे आवश्यक असल्याने वर नमूद विविध प्रजातीच्या झाडाच्या इमारतीवर व रोडवर, विद्युत तारेवर व परिसरात झुकलेल्या फांद्याची करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

## विषय क्र. 36

**अर्जदाराचे नाव :-** श्री. हेमंत गायकवाड.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 14.01.2025

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ, झाडाची गोलाई- 282 इंच, झाडाचे वय- 272 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं.2, वेलकम सोसायटी, काटोल रोड, नागपूर. येथील रोडलगत फुटपाथवर असलेया एक पिंपळ प्रजातीच्या झाडाचा फांद्या घराचा बांधकामात अडथळा निर्माण करित आहे. या झाडाच्या रोडवर व बाधाकामात अडथळा निर्माण करणाऱ्या झाडाच्या झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली, चर्चा होऊन समितीने वरील नमूद वृक्षाच्या इमारतीवर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

## विषय क्र. 37

**अर्जदाराचे नाव :-** श्री. रविशंकर कुभारे

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 13.01.2025

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ, झाडाची गोलाई- 130 इंच, झाडाचे वय- 127 वर्ष (हेरीटेज).
करंज, झाडाची गोलाई- 54 इंच, झाडाचे वय- 52 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. ११४,विश्वास नगर, नारी रोड, नागपूर. येथील रोडलगत फुटपाथवर असलेया (हेरीटेज) एक पिंपळ व एक करंज प्रजातीच्या झाडाचा अर्जदाराच्या इमारतीवर धोकादायकरित्या झुकलेल्या झाडाच्या फांद्या छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली, चर्चा होऊन समितीने वरील नमूद वृक्षाच्या इमारतीवर धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

## विषय क्र. 38

**अर्जदाराचे नाव :-** श्री. संजय बारलि

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 20.01.2025

**झाडाची प्रजाती :-** अशोका, झाडाची गोलाई- 55 इंच, झाडाचे वय- 53 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं.४, डेविड कॉलोनी, गोरेवाडा रोड, गिट्टीखदान, नागपूर. येथिल म.न.पा. क्षेत्रामध्ये एक अशोका **हेरिटेज** प्रजातीच्या अर्जदाराच्या इमारतीवर धोकादयाकरित्या झुकलेल्या झाडाच्या

फांद्या छाटणी करणे आवश्यक असल्याने समितिने वरील नमूद झाडाच्या इमारतीवर धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची मंजूरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन समितीने वरील नमूर झाडाच्य इमारतीवर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 39**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. हरिश टेवानी.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 27.01.2025

**झाडाची प्रजाती :-** सोनमोहर-1, (हेरीटेज) झाड गोलाई- 160 इंच, झाडाचे वय- 156 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** श्रीराम मोबाईल, माता मंदिर गल्ली, जरीपटका, नागपूर. येथिल म.न.पा. क्षेत्रामध्ये सोनमोहर-1, (हेरीटेज) प्रजातीच्या झाडाचा विद्युत तारेवर व इमारतीवर धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची मंजूरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन समितीने वरील नमूद झाडाच्या विद्युत तारेवर व इमारतीवर धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 40**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. कृष्णा शंकर परतेकी.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 06.02.2025

**झाडाची प्रजाती :-** रेनट्री, झाडाची गोलाई-138 इंच, झाडाचे वय-133 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं.173, कस्तुरबा लायब्ररी जवळ, सदर, नागपूर. येथिल म.न.पा. क्षेत्रामध्ये रेनट्री-1 (हेरीटेज) प्रजातीच्या झाडाचा परिसरात व इमारतीवर झुकलेल्या झाडाच्या फांद्या छाटणी करण्याची मंजूरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन समितीने वरील नमूद झाडाच्या परिसरात व इमारतीवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 41**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. भंते महानाग

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 07.02.2025

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ, झाडाची गोलाई-268 इंच, झाडाचे वय- 262 वर्ष ((हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** बुध्दविहार ,आंबेडकर मार्ग, भानखेरा, नागपूर. येथिल म.न.पा. क्षेत्रामध्ये पिंपळ (हेरिटेज) झाडाच्या बुद्ध विहारावर झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा

करण्यात आली. चर्चा होऊन वरील पुरातन (हेरीटेज) पिंपळ झाडाच्या बुद्ध विहारावर झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 42

**अर्जदाराचे नाव :-** श्री. सुरेश जग्यासी

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 27.01.2025

**झाडाची प्रजाती :-** 1) सेमल, झाडाची गोलाई-93 इंच, झाडाची वय-90 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं.१८, बँक कॉलोनी, राज फरसाण, फुंशी हॉस्पिटल समोर, जरीपटका, नागपूर. येथील परिसरात असलेल्या एक सेमल (हेरीटेज) प्रजातीच्या झाडाच्या इमारतीवर व रोडवर झुकलेल्या फांद्या धोकादयाकरित्या झुकलेल्या झाडाच्या फांद्यांची कापणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील पुरातन (हेरीटेज) शेमल झाडाच्या इमारतीवर व रोडवर झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 43

**अर्जदाराचे नाव :-** श्री. भरत संगर

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 10.01.2025

**झाडाची प्रजाती :-** सप्तपर्णी, झाडाची गोलाई- 95 इंच, झाडाची वय-92 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं.१०२,न्यू कॉलोनी, सुंदर किराणा जवळ, जरीपटका, नागपूर. येथील रोडलगत असलेल्या एक सप्तपर्णी झाडाच्या परिसरात धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील पुरातन (हेरीटेज) सप्तपर्णी झाडाच्या परिसरात धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 44

**अर्जदाराचे नाव :-** श्री. नंदा उईके

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 12.12.2024

**झाडाची प्रजाती :-** चिंच, झाडाची गोलाई- 65 इंच, झाडाची वय-62 वर्ष (हेरीटेज).

**प्रशाकीय शुल्क :-** 500/-

**झाडाचे विवरण :-** खलाशी लाईन, मोहन नगर, गोंड मोहल्ला, नागपूर येथील घरपरिसरात असलेल्या एक चिंच झाडाच्या धोकादयाकरित्या झुकलेल्या झाडाच्या फांद्या छाटणी करणे आवश्यक असल्याने सदर झाडाच्या धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 45**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. आशुतोस श्रीवास

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 06.02.2025

**झाडाची प्रजाती :- पिंपळ-1, झाडाची गोलाई -106 इंच, झाडाची वय** 102 **वर्ष ( हेरिटेज)**

**प्रशासकीय शुल्क :-** 500/-

**झाडाचे विवरण :-** महालाल महादेव मंदिर जैस्वाल ब्लॉक, बजेरिया, नागपूर येथिल घर परीसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** पिंपळ प्रजातीच्या झाडाच्या अर्जदार यांच्या इमारतीवर, परिसरात व इलेक्ट्रिक तारेवर झुकलेल्या फांद्या छाटणी करणे आवश्यक असल्याने सदर झाडाच्या इमारतीवर, परिसरात व इलेक्ट्रिक तारेवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 46**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. हेमंत गैर

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 10.02.2025

**झाडाची प्रजाती :-** वड+पिंपळ-1, **झाडाची गोलाई -176 इंच, झाडाची वय** 172 **वर्ष ( हेरिटेज)**

**झाडाचे विवरण :-** मच्छी मार्केट, राम मंदिर जवळ, भोईपुरा, नागपूर येथिल परीसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज) वड+पिंपळ-1** प्रजातीच्या झाडाच्या फांद्या मंदिरावर, परिसरात व इलेक्ट्रिक तारेवर झुकलेल्या असल्यामुळे फांद्या छाटणी छाटणी करणे आवश्यक असल्याने सदर झाडाच्या मंदिरावर, परिसरात व इलेक्ट्रिक तारेवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 47**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. जगन्नाथ यादव

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 10.02.2025

**झाडाची प्रजाती :- पिंपळ-1, झाडाची गोलाई -112 इंच, झाडाची वय** 108 **वर्ष ( हेरिटेज)**

**झाडाचे विवरण :-** बजेरिया चौक, संतोस सायकल स्टोर्स जवळ नागपूर येथिल परीसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज) पिंपळ-1** प्रजातीच्या झाडाच्या फांद्या इलेक्ट्रिक तारेवर झुकलेल्या असल्यामुळे फांद्या छाटणी छाटणी

करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधकाधक चर्चा होऊन सदर झाडाच्या इलेक्ट्रिक तारेवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 48**

**अर्जदाराचे नाव :-** श्रीमती. शिल्पा सुरेश कनोजिया

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 17.02.2025

**झाडाची प्रजाती :- आंबा-1, झाडाची गोलाई -84 इंच, झाडाची वय 80 वर्ष ( हेरिटेज)**

**झाडाचे विवरण :-** रेल्वे Q-नं.RB 2 257/B अजनी, नागपूर येथिल परीसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज) आंबा-1** प्रजातीच्या झाडाच्या फांद्या घरावर झुकलेल्या असल्यामुळे फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधकाधक चर्चा होऊन सदर झाडाच्या परिसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 49**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. मिहाल संजय वालदे

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 12.02.2025

**झाडाची प्रजाती :- गुलमोहर-1, झाडाची गोलाई -85 इंच, झाडाची वय 83 वर्ष ( हेरिटेज)**

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं.201, प्रथमेश राजा अपार्तमेंट उंटखाना मेडिकल रोड, नागपूर येथिल रोडलगत असलेल्या **पुरातन (हेरीटेज) गुलमोहर-1** प्रजातीच्या झाडाच्या फांद्या अपार्टमेंट वर झुकलेल्या असल्यामुळे फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर सभेत साधकाधक चर्चा होऊन चर्चेअंती सदर झाडाच्या शेजारच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**उपायुक्त (उद्यान)**
**तथा**
**वृक्ष अधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रशासक**
**तथा**
**अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**